IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# स्वातंत्र्यानंतर भारताने जमिनविषयक केलेले बदल व शासकीय योजना

प्रा. डॉ. म्हात्रे सुभाष ल.
वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय मुरुड-जंजिरा, जि. रायगड
subhashmhatre66@gmail.com

**प्रस्तावना:-**

भारत हा शेती प्रधान देश असल्याने शेतीच्या प्रश्नाला भारतीय अर्थव्यवस्थेत अनन्य साधारण महत्व आहे. जमिनीची मालकी व कृषी उत्पादन हा राष्ट्रीय विकासातील एक महत्वाचा मूलभूत विषय असल्याने नियोजन मंडळाने पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच मान्य केले आहे. कृषी समस्येच्या दोन बाजू आहेत.

1) जमिनीच्या लागवडीच्या दृष्टीने मालकी हक्काचा प्रश्न

2) जमिनीतून जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्याच्या करीता उपाय योजना करणे.

नियोजनाच्या विचार सुरु होताच कृषी संबधित कशाला प्राधान्य दयावे याबाबत चर्चा सुरु झाली. डाव्या गटाचे राजकीय पक्ष जमिनीच्या मालकीच्या प्रश्नाला अगक्रम देत होते. तर उजवा गट लागवडीच्या सुधारणेवर भर देत होतो. मात्र सरकारने दोन्ही प्रश्न एकाच वेळी हाताळण्याचे धोरण नियोजनाच्या सुरुवातीपासून ठरविले. त्यामुळेच स्वातंत्र्यानंतर शेतीचे विविध प्रश्न सोडविले गेले.

**भू-दान चळवळ:-**

भूमिहिनाच्या प्रश्न सोडविण्यासाठी भू-दान चळवळ 1951 पासून सुरु झाला. 1951 मध्ये तेलंगणात उद्भवलेल्या परिस्थितीशी व आचार्य विनोबा भावे यांच्या प्रभावी व्यक्तीमत्वाशी निगडित आहे. तेलंगणातील गरीब भू-मिहीन लोकांनी तंथील जमिनदारांविरुध्द उघडपणे हिंसात्मक उठाव केला. तेलंगणातील जिल्हयांतून आचार्या विनोबा भावेनी पदयात्रा करुन जमिनदाराना जमिन दान करण्याचे अवाहन केले. विनोबा भावे यांच्या अहवानाला प्रतिसाद देवून श्रीराम रामचंद्र रेड्डी याने 100 एकर जमिन दान केली.1

1951 या वर्षाच्या अखेरपर्यंत सुमारे 3 लक्ष एकर जमिन मिळवली होती. बिहार राज्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. 1953 पर्यंत या राज्यातून 8 लक्ष एकर जमीन भू-दानात मिळाली. 1958 पासून मात्र भू-दान चळवळीची प्रगती मंदावली. भू-दानात मिळालेली सर्व जमिन टिकून राहू शकली नाही. कारण बऱ्याच जमिनीवर दात्यांच्या जमिनीवरील वादग्रस्त हक्क कौटुंबिक झगडयामुळे जमिन वादात पडलेली असणे अश्या कारणांनी सरकारने त्या नामंजूर केल्या तर काही जमिनी स्वतः दात्यांनीच परत मागून घेतल्या

भारतातील ग्रामीण क्षेत्राच्या परिवर्तनाच्या व प्रगतीच्या दृष्टीने उचललेले एक क्रांतीकारक पाऊल होते. भूमिविषयक प्रगतीशिल कायदयाची अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने भू-दान व ग्रामदान हि चळवळ अतिशय महत्वाची ठरली आहे.

**जमिनविषयक सुधारणा:-**

स्वातंत्रयानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये जमिन विषयक धोरण जाहिर केले. त्या धोरणाच्या अंमलबजावणीच्या हेतून कृषी क्षेत्रात सुधारणा घडवून आणणारे विविध कायदे पारित केले गेले.

**1) जमिनदारी पध्दतीचे निर्मूलन:-**

भारतात रयतवारी महालवारी वा जमिनदारी अशा भूमी स्वामित्वाच्या तीन पध्दती होत्या. जमिनदारी पध्दतीत जमिनदार हा जमिनीचा मालक असून जमिनीच्या ताबा त्याच्याकडे असे. त्याच्या मालकीच्या सर्व जमिनीवरील महसुल सरकारला जमा करण्याची जबाबदारी त्याचीच असे कुळाचा शोषण व कृषी क्षेत्रात अनुपस्थित जमिनदारांचा वर्ग निर्माण करणारी हि पध्दत ब्रिटिशानी सुरु केली होती. या पध्दतीनुसार महसुल गोळा करणारे एजंट्स नियुक्त करणे हे सरकारचे उद्दिष्टय होते. परंतु महसूलाची रक्कम कायम आधारावर ठरल्यासारखी असल्याने त्याचा फायदा घेवून मध्यस्थानी ग्रामीण भागात शेतकर्‍यांचे शोषण केले. त्यातूनच मालक व कुळ असे दोन वर्ग निर्माण होऊन जमिन कसणारा वर्ग व सरकार यात जमिनदार मध्यस्थ बनला.

स्वातंत्रयाप्राप्तीनंतर भारत सरकारने कृषी क्षेत्रात शोषणाला वाव देणार्‍या जमिनदारी पध्दतीचे निर्मुलन करण्याचे ठरविले. 1954 पर्यंत देशातील सर्व राज्यांनी जमिनदारीचे उच्चाटन करणारे कायदे पारित केले. दोन कोटीपेक्षा अधिक कुळाचा सरकारशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाला. या कायदयामुळे सरकारला महसुल गोळा करण्याचा अधिकार मिळून मध्यस्थ नष्ट झाले. जमिन कसणार्‍यांना जमिनीची मालकी मिळाली तरीपण जमिनदारांनी वैयक्तीक लागवडीसाठी जास्तीत जास्त जमिन आपल्या स्वतःच्या नावावर व नातेवाईकांच्या नावावर करुन जमिन वाचविता येईल तेवढी वाचविली.2

**कुळांच्या हक्कांसंबंधी सुधारणा:-**

भारताच्या कृषी क्षेत्रात कुळांची परिस्थिती दयनिय होती. ते कसत असलेली जमिन त्यांच्याकडे राहिल. यांची शाश्वती नव्हती. त्यांना दयावा लागणारा खंड फार जास्त होता. त्यामुळेच स्वातंत्र्यानंतर कुळांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आडण्याकरीता विविध उपाय योजना करण्यात आल्या.

**1) खंड निश्चिती:-**

पूर्वी कूळांना खंड म्हणून उत्पन्नाच्या 50% पेक्षाही जास्त भाग जमिनदाराला दयावा लागत. याशिवाय इतर ही प्रकारचे कर दयावे लागे. हा आर्थिक बोजा त्यांच्या आवाक्याच्या बाहेरचा होता. तो भार हलका व्हावा या हेतुने एकूण उत्पन्नाच्या 20%ते 30% पेक्षा अधिक खंड देवू नये असे सरकाने ठरवून दिले.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

**2) जमिन कसण्याची शाश्वती :-**

शेतकरी कसत असलेली जमिन त्यांच्याकडे राहिल याची शाश्वती नसल्याने उत्पादनवृध्दीकरीता जमिनीत अधिक खर्च करण्याची तयारी नसे. त्या दृष्टीने कुळांना तशी शाश्वती देणारे कायदे विविध राज्यांत पारीत केले.

**3) कुळांना जमिनीची मालकी :-**

कुळांना ते कसत असलेली जमिन त्यांच्या मालकीची व्हावी या उद्देशाने भारत सरकारने 1948 मध्ये कुळ वहिवाट कायदा पास केला. हा कायदा कुळ कसत असलेला जमिनीचा मालकी हक्क मिळवून देणारा कायदा होता. या कायदयामुळे देशातील सुमारे 30 लक्ष कुळांना ते कसत असलेल्या जमिनीचा मालकी हक्क मिळाला.3

**धारण क्षेत्राची कमाल मर्यादा:-**

प्रत्येक शेतक-याकडे जास्तीत जास्त किती जमिन असावी व त्यापेक्षा अधिक जमिन ज्या शेतक-याकडे असेल ती त्यांच्याकडून सरकारने भू-मिहीन शेतमजूर व छोटा शेतकरी यांच्यात वितरीत करणे याची निकड सरकारला जाणावली. 1952 मध्ये जमिनधारणेबाबत कायदा करुन राज्य सरकारला तसे आदेश देण्यात आले. त्यानुसार सर्व राज्यानी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखरेपर्यंत जमिनीच्या कमाल मर्यादा निश्चित करुन दिल्या. जमिनीसारख्या नैसर्गिक संपत्तीचे थोडया लोकांच्या हाती केंद्रीकरण होऊ नये. अतिरिक्त जमिनीचे वितरण करुन ग्रामीण क्षेत्रात समता निर्माण व्हावी कृषी उत्पादन वाढावे अशी उद्दिष्टये होती.

**सहकार शेती:-**

स्वातंत्र्यानंतर जमिनीचे तुकडे इतके लहान झाले होते की धारण क्षेत्राचा आकार किफायतशीर राहिला नव्हता. जमिनीच्या लहान भागावर कोणत्याही प्रकारच्या कृषी सुधारणा करणे कठीण होतो. तसेच उत्पादनावाढीसाठी शेतीचे यांत्रिकीकरण करण्यासाठी शेतीचे क्षेत्र मोठे असणे आवश्यक असते. त्यामुळे सरकारने सहकार शेतीला प्रोत्साहन दिले होते. सहकार क्षेत्रामध्ये राजकीय नेत्वृत उभे राहिल्यामुळे राष्ट्रीय परवाना धोरणामध्ये सहकार क्षेत्राला वर्चस्व प्राप्त झाले. कारखानादारी नेतृत्वाने सहकार चळवळीला चालना मिळावी. विकासाच्या राजकारणामुळे ग्रामीण भागाचा कायापालट झाला. साखर कारखान्याच्या परिसरात आर्थिक सुबत्ता आली आणि ग्रामीण जनतेत नवा विश्वास निर्माण झाला.

**जलसिंचन योजना:-**

भारतातील शेतकरी मान्सूनच्या लहरीवर अवलंबून असे परंतु मान्सूनचा पाऊस कधी जास्त तर कधी कमी पडतो. त्यामुळे शेतीच्या उत्पादनावर परिणाम होतो. शेतीला नियमित पाणी पुरवठा झाला तर उत्पादनात वाढ होतोच शिवाय आधुनिक पध्दतीने शेती करणेही शक्य होते. म्हणूनच स्वातंत्र्यानंतर पाणी पुरवठयाच्या सोयींवर भर देण्यात आला. देशातील 16 कोटी हेक्टर जमिनीपैकी 4.5 कोटी हेक्टर जमिनीला पाट बंधारे तलाव, विहीर, उपसा सिंचन या

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

व्दारे पाणीपुरवठा करण्यासाठी विविध योजना आखल्या गेल्या दामोदर व्हॅली भाक्रा नानगल, हिराकुड योजना फराक्का प्रकल्प इत्यादी प्रकल्पाव्दारे पाणीपुरवठयाच्या योजना किसित करण्यात आल्या.

**शेतीला कर्जपुरवठाः-**

निसर्गाच्या अवकृपेमुळे अनेकदा उत्पादनावर होणारा विपरीत परिणाम इत्यादी कारणामुळे भारतीय शेतकऱ्यांच्या दुःख व दारिद्रयाचे निराकरण करणे कठीण होते. पावसाने दगा दिला तर शेतकऱ्याला सावकार किंवा व्यापारी यांच्याकडून जास्त व्याज देऊन कर्ज घेण्याशिवाय शेतकऱ्याला गत्यंतर नव्हते. त्यातूनच शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा वाढू लागला. यासाठी सरकारने इम्पीरियल बँकेचे राष्ट्रीयकरण करुन त्या बँकेला स्टेट बँक ऑफ इंडिया असे नाव देण्यात आले. या बँकेतुन शेतीला कर्जपुरवठा देण्याची व्यवस्था करण्यात आली. 1956 मध्ये राष्ट्रीय सहकारी विकास व गोदाम मंडळ 1957 मध्ये केंद्रीय गोदाम महामंडळाची स्थापना करण्यात आली. भारत सरकार व रिझर्व बँक यांच्या सहकार्याने केंद्रीत सहकारी प्रशिक्षण समितीची स्थापना करण्यात आली. अशा विविध योजनातून शेतकऱ्यांना योग्य वेळी व योग्य प्रमाणात कर्जपुरवठा व्हावा व शेतकऱ्याची सावकाराच्या कचाटयातुन मुक्तता व्हावी या दृष्टीने उपाय योजना करण्यात आली.

**शेतमालाची विक्रीः-**

शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती सुधारणा होण्याच्या दृष्टीने शेतमालाला योग्य भाव मिळणे चांगल्या गोदामाची सोय होणे. संघटित विक्री संस्था प्रस्थापित होणे, बाजार विषयक माहिती शेतकऱ्यांना मिळणे या गोष्टी फार महत्वाच्या ठरतात. वरील समस्या दूर करण्यासाठी भारत सरकारने डायरेक्टर ऑफ मार्केटिंग ॲन्ड इन्सपेक्शन हि संस्था स्थापन केली. केंद्र सरकार व राज्य सरकार यांना शेतमालाच्या विक्रीबाबत मार्गदर्शन करणे शेतमालाची प्रतवारी शेतमालाच्या विक्री क्षेत्रातील व्यक्तींना आवश्यक ते प्रशिक्षण देणे इत्यादी कामे या संस्थेव्दारे केली जातात. बाजारपेठातील दोष दूर करण्यासाठी नियंत्रित बाजारपेठाची स्थापना करण्यात आली. बाजारपेठेचे व्यवस्थापन बाजार समितीवर असतो. या समितीवर सरकार स्थानिक संस्था व्यापारी शेतकरी यांचे प्रतिनिधी असतात. बाजारविषयक आवश्यक माहिती शेतक-यांना पुरवली जाते.

**सारांशः-**

स्वातंत्र्यानंतर भारताने नियोजनाचा स्वीकार करुन पंचवार्षिक योजनेच्या माध्यामातून आपला आर्थिक विकास करण्यावर भर देण्यात आला. शेती क्षेत्रातील असमानता दूर करून भू-मिहीन शेतकाऱ्याना शेती मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. सावकाराकडून होणारी पिळवूक थांबविण्यासाठी विविध उपाय योजना अखून शेतकऱ्याला प्रोत्साहन देण्यात आले. आज शेती क्षेत्रात झालेली प्रगती पाहता भारत एक उत्पादन करणारा राष्ट्र म्हणून गणला जातोय.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

**संदर्भः-**

1) स्वामी व्ही.एन. - महाराष्ट्रातील समाज सुधारक, संत साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, विद्या भारती प्रकाशन, लातूर 2002, पान नं. 121.

2) डॉ. कोठेकर शांता - आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2010, पा नं. 513.

3) डॉ. चैधरी कि. का., रायगड जिल्हा गॅझेटिअर, 1983, पान नं. 300.